# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ )

जा.क्र. ३९४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–०८/०७/२०१६.

**१) जिवानाशी ठार मारण्याचा प्रयत्न केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०६/०७/०१६ रोजी २१.०० वा. फिर्यादी विवाहित महिला वय २२ वर्ष ही तिच्या पती सोबत बाजार करून घरी परत आल्यानंतर तिन्ही आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादी व तीच्या पतीला जुन्या भांडणाच्या कारणावरून शिवीगाळ केली, त्यावर फिर्यादीच्या पतीने आरोपीतांना हटकले यावरून आरोपी क्र. १ ने लाकडी बॅट ने फिर्यादीच्या पतीच्या डोक्यावर मारून जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न केला तसेच फिर्यादी व तीचे वडील भांडण सोडविण्यास गेले असतांना त्यांना देखील ढकलढुकल करून फिर्यादीच्या वडीलाच्या तोंडावर मारले. असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३०७,५०४,३४ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. लाखडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत. सदर गुन्हयातील आरोपी क्र. १ याला अटक करण्यात आली आहे.

**२) मोटार सायकलची चोरी. :–**

दिनांक ०६/०७/२०१६ रोजी १७.०० ते २०.०० वा. दरम्यान फिर्यादी प्रकाश मुनीराज घडले वय ६० वर्ष, रा. म्हाडा कॉलोनी खात रोड भंडारा यांचा मुलगा आशुतोष प्रकाश घडले वय २५ वर्ष हा त्याची मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम २१५४ हीरो होन्डा कि.२०,०००/–रु. ची मुस्लीम लायब्ररी चौक भंडारा येथील टयुशन क्लासच्या समोर ठेवली होती, ती कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेली. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. शिंदे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) महिलेला अश्लिल शब्दात व जातिवाचक शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ०७/०७/२०१६ रोजी १७.३० वा. फिर्यादी महिला वय ४० वर्ष, ही तिच्या घराच्या समोरील अंगणात झाडु लावत असतांना तिन्ही आरोपी हे घरा समोर रोडवर येवुन फिर्यादीला पाहुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवानिशी मारतो असे म्हणुन जाती वाचक शिवीगाळ केली. असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २९४,५०४,५०६,५०९,३४ भादंवि सहकलम ३(१०) अ.जा.ज.अ.प्र. कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा श्री. जोगदंड हे करीत आहेत. सदर गुन्हयातील आरोपी क्र. १ याला अटक करण्यात आली आहे.

४) अवैध दारू अडयांवर धाडी. :–

दिनांक ०७/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. तुमसर व पालांदुर येथील परीसरातील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०५ लिटर हातभट्टी दारू कि. ३००/–रू. व ०१ लिटर १६० मिली. देशी दारू कि. ६४०/–रू. असा एकुण कि. ९४०/–रू. चा माल जप्त करण्यात आला.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.